# <u>शालेय पोषण आहार योजना</u>

शालेय पोषण आहार योजना जिल्हयातील सर्व 15 तालुक्यातील पात्र शाळांमधिल इ.1ली ते 5वी व इ.6वी ते 8वी असे दोन गटात शासनाने ठरवुन दिलेल्या प्रमाणा नुसार साप्ताहीक पाककृती तयार करुन शालेय पोषण आहार योजनेचा मध्यान्न भोजन म्हणुन विद्यार्थ्यांना लाभ दिला जातो.

सदर योजना सन 2002-2003 महाराष्ट्र शासन निर्णय क्र.प्रशा-1095/2130/प्राशि/दि.22/11/1995 त्याच प्रमाणे शासन निर्णय क्र.प्राशा/10902383/97 दि.28/09/1999 व महाराष्ट्र शासन निर्णय क्र.शालेय/2390/प्र.क्र.507/नापु/97 अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय मुंबई दि.28/08/1999 तसेच शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्र शापोआ-2010/प्र.क्र.18/प्राशि-4/ दि.2 फेब्रुवारी 2011 तसेच शालेय शिक्षण विभाग शासन परिपत्रक दि.26/02/2010 मध्ये विषद केलेल्या कार्य पध्दती नुसार शालेय पोषण आहार योजनेचे यशस्वी अंमलबजावणी जिल्हयात सुरु आहे.

जिल्हा परिषद जळगाव मधिल 15 तालुक्यातील योजनेस पात्र शाळंाची संख्या 2754 असुन त्यात प्राथमिक व माध्यमिक विद्यार्थी लाभार्थी संख्या इ.1ली ते इ 5वी 275995 व इ.6वी ते इ.8वी 175648 असे एकुण 466573 (एप्रिल 2021 अखेर ) आहेत.सदर योजनेतुन लाभार्थी 90 ते 95 टक्के उपस्थिती असुन मागणी नुसार सर्व विद्यार्थी लाभार्थ्यांना सदरील योजनेचा लाभ झालेला आहे.

तसेच शासन निर्णय क्र.शापोआ/2003/34/03 दि.03/03/2003 पासुन शालेय पोषण आहार योजनेतंर्गत देण्यात येणारा आहार शिजवुन देणे बाबत बंधनकारक करण्यात आले आहे.

या योजने अंतर्गत आहार शिजवुन देण्याचे अनुदान माहे एप्रिल 2021 पासुन प्रति विद्यार्थी प्रति दिवस शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचा सुधारीत शासन निर्णय क्र.शापोआ/2020/प्र.क्र.85/एस.डी.3 दि.24 नोव्हेंबर 2021 नुसार एप्रिल 2021 पासुन सुधारीत दर इ.1ली ते इ.5वी प्रति विद्यार्थी प्रतिदिन एकुण खर्च **<u>रु.4.97</u>** सदर रक्कमेची विभागणी इ.1ली ते इ.5वी धान्यादी माल खरेदी प्रति विद्यार्थी **<u>रु.3.08</u>** व इंधनभाजीपाला **<u>रु.1.89</u>** तसेच व इ.6वी ते 8वी **<u>रु.7.45</u>** सदर रक्कमेची विभागणी इ.6वी ते इ.8वी धान्यादी माल खरेदी प्रति विद्यार्थी **<u>रु.4.61</u>** व इंधनभाजीपाला **<u>रु.2.84</u>** प्रमाणे रक्कम अनुज्ञेय केलेली आहे.

तसेच योजनेतंर्गत सर्व पात्र शाळांना अचानक भेटी देऊन सर्व लाभार्थी विद्यार्थ्यांना नियमाप्रमाणे योजनेचा लाभ दिला जातो किंवा नाही याची पाहणी व पडताळणी तालुकास्तरावरुन गटशिक्षणाधिकारी व अधिक्षक (शापोआ) तसेच विस्तार अधिकारी (शिक्षण),केंद्र प्रमुख इ.तसेच जिल्हास्तरावरुन शिक्षणाधिकारी (प्राथ) व (माध्य),उपशिक्षणाधिकारी (प्राथ) व (माध्य) ,लेखाअधिकारी (शापोआ) तसेच विस्तार अधिकारी (शिक्षण) तसेच राज्यस्तरीय अधिकारी यांचे मार्फत केली जाते.

**<u>शालेय पोषण आहार योजनेचे उद्यीष्ट :-</u>**

1 विद्यार्थ्यांचे शरीराचे उत्तम पोषण व्हावे

2 प्राथमिक शाळांमधिल पट नोंदणी वाढविणे

3 प्राथमिक शाळांमधिल विद्यार्थ्यांची दैंनंदिन उपस्थिती वाढविणे

4 विद्यार्थ्यांची शाळेत पूर्ण वेळ उपस्थिती वाढविणे

5 स्पृष्श अस्पृष्श भेदभाव नष्ट करणे

6 स्त्री पुरष लींग भेदभाव नष्ट करणे

**<u>शालेय पोषण आहार योजना कोणत्या शाळांसाठी लागु आहे :-</u>**

1 जिल्हा परिषद शाळा

2 महानगर पालिका शाळा

3 नगर पालिका/ परिषद शाळा

4 पुर्ण व अंशत: अनुदानित खाजगी शाळा

5 आश्रमशाळा (अनिवासी विद्‌यार्थी)

6 वस्तीशाळा (पूर्वीच्या, आता नियमित शाळा)

7 महात्मा फुले शिक्षण हमी केंद्र

8 मदरसा व मक्तब

9 पर्यायी शिक्षण केंद्रे (वरिल व्यातिरिक्त )

**<u>शालेय पोषण आहार योजने मध्ये शाळांना शासना मार्फत काय देण्यात येते :-</u>**

इ.1ली ते इ.5वी चे वर्ग असणा-या शाळांना प्रति विद्‌यार्थी प्रति दिवस 100 ग्रॅम तांदूळ व इ.6वी ते इ.8वी चे वर्ग असणा-या शाळांना प्रति विद्‌यार्थी प्रति दिवस 150 ग्रॅम तांदूळ तसेच अन्न शिजवून देण्यासाठी प्रति विद्‌यार्थी प्रति दिन शासनाने निश्चित केल्या प्रमाणे अनुदान (परिच्छेद 5 मध्ये प्रमाणे)

**<u>शालेय पोषण आहार योजनेतंर्गत दररोज किती कॅलरीज व प्रोटीन्स देण्यात यावेत :-</u>**

केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आहार विषयक गरजांच्या अभ्यासा वरुन इ.1ली ते इ.5वी च्या वर्गातील विद्‌यार्थ्यांना 450 कॅलरीज व 12 ग्रॅम प्रोटीन्स तसेच इ.6वी ते इ.8वी चे विद्‌यार्थ्यांना 700 कॅलरीज व 20 ग्रॅम प्रोटीन्स देणे आवश्यक आहे. पात्र शाळेतील विद्‌यार्थ्यांना एका वर्षासाठी साप्ताहीक पाककृती तयार करुन मध्यान्न भोजनात दररोज वेगळा मेनु दिला जाईल असे नियोजन केले जाते.तसेच त्यासोबत आठवडयातुन एक दिवस पुरक आहार (सोया बिस्कीट,राजगिरा लाडु,गुळ शेंगदाणे,खजुर,केळी,अंडी,मुरमुरा चिवडा इ.) दिला जातो.

तसेच सन 2020-21 मध्ये (एप्रिल 2020 ते एप्रिल 2021 ) माहे एप्रिल 2020 पासुन कोरोना विषाणू प्रादूर्भावाच्या परिस्थितीमध्ये विद्‌यार्थ्यांना शालेय पोषण आहाराचा लाभ देणे आवश्यक असल्याने तसेच सद्‌या परिस्थितीत शाळा बंद असल्यातरीही पात्र विद्‌यार्थ्यांना अनुज्ञेय तांदूळ व अन्नशिजविण्यासाठीचा खर्च दराच्या मर्यादेत (कुकींक कॉस्ट) धान्यादी मालाच्या स्वरुपात मुगडाळ,तुरडाळ व मसुरडाळ यापैकी एक डाळ तसेच उसळ मध्ये हरभरा,मटकी,आख्खामुग,चवळी यापैकी एक मा. शिक्षण संचालक (प्राथ),म.रा.पुणे यांचे कडील वेळोवेळी निर्गमित होणारे परिपत्रकतील निर्देशा नुसार शाळास्तरावर विद्‌यार्थ्यांना वाटप केले आहे.

तसेच मा.शिक्षण संचालक (प्राथ) ,म.रा.पुणे यांनी दिलेल्या दि.25/6/2021 चे पत्रातील सुचना नुसार उन्हाळी सुटी (माहे मे 2021) करिता सदर योजनेचा लाभ थेट विद्‌यार्थ्यांचे बँक खाती (डी.बी.टी.व्दारा) देणेसाठी जिल्हयातील योजनेस पात्र विद्‌यार्थ्यांचे बँक खाते काढण्याचे काम सुरु आहे. सद्‌या 90टक्के विद्‌यार्थ्यांचे बँक खाते उघडण्यात आले आहेत. तसेच मा.शिक्षण संचालक (प्राथ) ,म.रा.पुणे यांनी दि.25/6/2021 चे परिपत्रकातील दिलेल्या निर्देशानुसार माहे जुन 2021 ते जुलै 2021 या महिन्यांचे 40 कार्यदिवसांसाठी योजनेस पात्र शाळेतील विद्‌यार्थ्यांना शाळास्तरावर विद्‌यार्थ्यांना तांदूळ तसेच धान्यादी मालात मुगडाळ व हरभरा निश्चित केलेल्या प्रमाणा नुसार (कुकींग कॉस्ट खर्चाचें मर्यादेत ) वाटपाचे काम पुर्ण झाले आहे. जळगाव जिल्हयात 15 तालुक्यातील एकुण 2753 शाळेतील इ.1ली ते 5वी चे 288057 विद्‌यार्थी व इ.6वी ते 8वी चे 178516 विद्‌यार्थी असे एकुण 466573 विद्‌यार्थ्यांना सदरचा लाभ देण्यात आला आहे.